**जयहिंद इंडस्ट्रीज लिमिटेड**
CIN : U74999PN1947PLC005480
रजिस्टर्ड ऑफिस : मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे - ४११ ०३५.
दुरध्वनी : +९१ २० २७४७३९८१ फॅक्स : +९१ २० २७४७४८२७
**वेबसाईट :** www.jayahind.com

JAYA HIND
**Casting End-to-End Solutions**

# मुदत ठेव योजना

जयहिंद इंडस्ट्रीज लिमिटेड (कंपनी म्हणून संबोधिले जाते) त्यांच्या सभासदांद्वारे तसेच जनतेकडून कंपनी कायदा २०१३ (कायदा) यातील कलम ७३ व ७६ आणि कंपनी (ठेवी स्विकारणे) विधीनियम २०१४ (विधीनियम) वाचला जातात त्याखालील योजनेनुसार ठेवी मागविण्यात येत आहेत.

१) **सभासदांकडून ठेवी –** सदस्यांकडून एकूण ₹ ८३,५६२.९५ लाखांपर्यंत, जे कंपनीचे १०% देय भांडवल आणि जे दि. ३१/३/२०१८ रोजीचे शिलकी आहे, अशा पासुन वेगळे आहे, अशी ठेवी स्विकारण्यात याव्या.

२) **जनतेकड्च्या ठेवी –** जनतेकडून एकूण ₹ २,०८,९०७.३७ लाखांपर्यंत, जे कंपनीचे २५% देय भांडवल आणि जे दि.३१/३/२०१८ रोजीचे शिलकी पासुन वेगळे आहे अशी ठेव स्विकारणेत यावी.

३) **किमान ठेवीची रक्कम –** ₹ १,००,०००/– यासोबत ₹ १०,०००/– याप्रमाणे अतिरिक्त पटीत रक्कम.

४) **ठेव स्विकारण्याचा कालावधी –** ठेव स्विकारल्यापासुन ६ महिन्यापेक्षा जास्त परंतू त्याचा कालावधी ३६ महिन्यांपेक्षा जास्त नसावा.

५) ठेव स्विकारल्यापासुन वा नुतनीकरण केलेल्या तारखेपासुन ३ महिने संपण्पुर्वी (मुदतीच्या अगोदर) रक्कम काढण्यास परवानगी दिली जाणार नाही. ठेवी ठेवलेल्या नुतनीकरण केलेल्या तारखेपासुन ते ठेव परतावा तारखेपर्यंत व्याज कपात करुन योग्य वेळेच्या अगोदर रक्कम काढण्यास परवानगी दिली जाईल. जर व्याजाचे अधिक प्रमाण दिले गेले असेल तर ठेव परतावा करतांना कंपनीतर्फे ते वसुल केले जाईल.

६) **व्याजाचा दर**

| कालावधी | दर वर्षीचा व्याज दर |
|---|---|
| ६ महिन्यापासुन ते १ वर्षापर्यंत | ९% |
| १ वर्षापेक्षा जास्त ते २ वर्षापर्यंत | १०% |
| २ वर्षापेक्षा जास्त ते ३ वर्षापर्यंत | ११% |

७) **दलाली :–** कंपनी कोणालाही दलाली देणार नाही.

८) वैयक्तिक एका नावावर किंवा तिघांपेक्षा जास्त नाही अशाच्या संयुक्तिक नावावर ठेव ठेवता येईल.

९) संयुक्त ठेवीचा परतावा एकतर समाईक पद्धतीने किंवा वारसांना किंवा पहिले नाव दिले असेल त्यात किंवा वारसदार किंवा त्यापैकी कोणाही एकास किंवा वारसास दिला जाईल.

१०) या योजनेत कंपनी पुढील कालावधीपासुन बदल किंवा सुधारीत प्रमाणे फेरफार करु शकेल.

११) कंपनी कायद्यातील कलम ७३ च्या तरतुदीनुसार ज्या नियमाने जाहिराती किंवा परिपत्रातील ठेवी मागणेच्या उद्देशाने दिल्या जातात, त्या कंपनी कायद्यातील कलम ७३ च्या तरतुदीनुसार व त्यासोबत लागु असलेल्या नियमावलींची पुर्ण पुर्तता करतात. त्याची मुळ प्रत या योजनेच्या सोबत जोडलेली आहे.

१२) कोणत्याही व्यक्तीची कोणतीही ठेव स्विकारणे वा नाकारणे हा हक्क कंपनी राखुन ठेवत आहे. ठेव स्विकारणे हे कंपनीच्या मर्जीवर अवलंबुन असेल. ठेवी ठेवण्याबद्दलचा प्रस्ताव नाकारल्यास त्याचे स्पष्टीकरण देणे कंपनीवर बंधनकारक राहणार नाही.

## अर्ज डीपीटी – १

**ठेवी मागविण्यासंदर्भातील परिपत्रक किंवा जाहिरातीच्या स्वरुपातील परिपत्रक :**

किंपनी (ठेव स्वीकृती) अधिनियम २०१४ च्या नियम ४ (१) आणि ४ (२) आणि कलम ७३ (२) (अ) आणि कलम ७६ च्या अनुषंगाने जाहिरातीतील नमुन्याप्रमाणे खालील गोष्टी असतील.

१. **सर्वसाधारण माहिती :**

ए. * कंपनीचे नाव, पत्ता, संकेतस्थळ आणि संपर्कविषयक इतर तपशील : जयहिंद इंडस्ट्रीज लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता: मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे – ४११ ०३५, दुरध्वनी क्रं. ०२०–२७४७३९८१
फॅक्स क्र. ०२० – २७४७४८२७ कॉर्पोरेट आयडेंटिटि क्रमांक : U74999PN1947PLC005480 संकेतस्थळ : www.jayahind.com

बी. कंपनीच्या स्थापनेची तारीख : ११ जानेवारी, १९४७.

सी . कंपनीचा व्यवसाय तसेच कंपनीच्या शाखांबद्दल तपशील – ॲल्युमिनीयम डाय कास्टींग आणि ऑटो कॉम्पोनंटचे उत्पादक. कंपनीचे आकुर्डी, जि. पुणे (महाराष्ट्र), पिठमपूर, जि. धार (मध्यप्रदेश), उर्से, जि. पुणे, (महाराष्ट्र), चाकण, जिल्हा पुणे (महाराष्ट्र) येथे कारखाने आहेत.

डी. कंपनीच्या व्यवस्थापनासंबंधीचा संक्षिप्त तपशील – कंपनीचे व्यवस्थापन मंडळाच्या संचालकांकडून चेअरमन श्री. अभयकुमार नवलमल फिरोदिया व व्यवस्थापकीय संचालक श्री. प्रसन फिरोदिया यांना प्रदान केलेल्या अधिकाराप्रमाणे चालते.

ई. **संचालकांची नावे, पत्ता, डीन व व्यवसाय –**

| अ.क्र. | नाव व पत्ता | डीन | व्यवसाय |
|---|---|---|---|
| १ | **श्री. अभयकुमार नवलमल फिरोदिया**<br>'सन्मित्र', १३२/ब, गणेशखिंड रोड, पुणे – ४११ ००७. | ०००२५१७९ | उद्योगपती |
| २. | **श्री. प्रसन अभयकुमार फिरोदिया**<br>'सन्मित्र', १३२/ब, गणेशखिंड रोड, पुणे – ४११ ००७. | ०००२९६६४ | उद्योगपती |
| ३. | **सौ. इंदिरा अभयकुमार फिरोदिया**<br>'सन्मित्र', १३२/ब, गणेशखिंड रोड, पुणे – ४११ ००७. | ०००३५११५ | गुंतवणूकदार |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | **श्री. मोहनलाल गिरधारीलाल चोपडा**<br>१२, भोसले नगर, पुणे – ४११ ००७ | ०००४०८६८ | उद्योगपती |
| ५. | **सौ. श्रीबाला सागर चोरडिया**<br>बिल्डींग ए–१००२, सिल्वर वुडस् नॉर्थ मेन रोड,<br>कोरेगाव पार्क, पुणे – ४११०३६ | ०००४१५५७ | गुंतवणूकदार |
| ६. | **श्री. प्रदिप कनकमल मुनोत**<br>४२७, गुलटेकडी, पुणे – ४११ ०३७. | ०००४४९२४ | उद्योग |
| ७. | **श्रीमती. श्यामला नवलखा**<br>सी–४०३, कस्तुरकुंज, १०, आय.सी.एस. कॉलनी, कॉसमॉस बँकेजवळ, पुणे – ४११००७ | ००१८८२८७ | गुंतवणूकदार |
| ८. | **सौ. सुनंदा सुधीर मेहता**<br>प्लॉट नं २६, यशवंत घाडगे नगर, को.ऑ.हौ.सोसायटी भोसलेनगर, पुणे–४११००७ | ००२८९६२४ | उद्योग |
| ९. | **सौ. हर्षा गौतम जैन**<br>व्हीला १४/१३ (डब्ल्यू सब मीटर), ३९४, इमरातीज हील, ३ रे<br>प्रिमाइस नं. : ३९४००७४३३, प्रिमाइस टाईप : रेसीडेन्सीयल व्हीला, दुबई १८३०३ ए.ई. | ००३४६१३४ | गुंतवणूकदार |
| १०. | **श्री. कुंदनलाल चुन्नीलाल खिंवसरा**<br>४४६, गोखले रोड, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५ | ०२३९९८०९ | उद्योग |
| ११. | **श्री. मोहिंदर सिंग भोगल**<br>प्लॉट नं. ४७५ सेक्टर–२५, पीसीएनटी निगडी, पुणे – ४११०४४ | ०१३०३५०३ | कार्यकारी संचालक |

**एफ. जोखमीसंदर्भात व्यवस्थापनाचे अनुमान :**

कंपनी मोटारवाहनांसाठी व त्यांच्या भागांसाठी ॲल्युमिनीअम कास्टींगचे उत्पादन करते. मोटार वाहनांच्या मागणीवर वाहन उद्योगाची भरभराट अवलंबुन असते तसेच वाहनांच्या उद्योगाच्या विस्तारावर कंपनीची उलाढाल अवलंबुन असते. ॲल्युमिनीअम एक धातू असल्याने त्याच्या किमतीत चढउतार आहे. कंपनी ग्राहकाने वाढविलेल्या धातुच्या किमती स्विकारणे या अनुषंगाने जोखमीचे आहे.

**जी. डिफॉल्टसंबंधी (दोषपात्रतेसंबंधी) तपशील, समाविष्ट रक्कम, डिफॉल्टचा कालावधी आणि खालील परतफेडीसंदर्भात सद्यस्थिती :**

१) कायदेशीर देणी (स्टॅट्युटरी ड्यूज) – नाही

२) डिबेंचर्स आणि त्यावरील व्याज – नाही

३) कोणत्याही बँकेचे किंवा वित्त संस्थेचे कर्ज आणि त्यावरील व्याज – नाही

**२. ठेव योजनेचा तपशील :**

ए. मंडळाचा ठराव पारित होण्याची तारीख : २७ डिसेंबर, २०१८.

बी. अशा प्रकारच्या ठेवी मागविण्यासाठी मान्यता देण्याकरिता सर्वसाधारण सभेमध्ये ठराव पारित करण्याची तारीख : २७ डिसेंबर, २०१८.

सी. ठेवींचे प्रकार अर्थात् सिक्युअर्ड किंवा अनसिक्युअर्ड – अनसिक्युअर्ड.

डी. कंपनीद्वारे कायदा आणि अधिनियमानुसार ठेवीच्या माध्यमातून उभी केली जाऊ शकणारी रक्कम आणि मागील लगतच्या आर्थिक वर्षाच्या अंतिम दिवशी आणि परिपत्रक किंवा जाहिरात जारी करण्याच्या तारखेला प्रत्यक्ष धारण केलेल्या एकंदर ठेवी आणि ठेवींद्वारे उभी करावयाची प्रस्तावित रक्कम आणि पुढील बारा महिन्यांमध्ये परतफेड करावयाची ठेव रक्कम :

| | | (₹ लाख मध्ये) |
|---|---|---|
| १) | कंपनीच्या सभासदांकडून उभी केली जाऊ शकणारी ठेव रक्कम | ८३,५६२.९५ |
| २) | जनतेकडून उभी केली जाऊ शकणारी ठेव रक्कम. | २,०८,९०७.३७ |
| ३) | जनतेकडून दि ३१ मार्च २०१८ रोजी कंपनीने स्विकारलेल्या ठेवी * | ९७९.७० |
| ४) | कंपनीने सदर परिपत्रक जारी केलेल्या तारखेच्या स्विकारलेल्या ठेवी * | ८७४.७० |
| ५) | दि. १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ दरम्यान परतफेड योग्य ठेवी रक्कम * | -- |
| ६) | सुचवलेल्या उभारु शकणारी एकंदर ठेवी रक्कम. | ४,१२५.३० |
| ७) | पुढील १२ महिन्यात ठेवीच्या परतफेडीची रक्कम * | ७०९.७० |
| ८) | दि. ३१ मार्च २०१८ रोजी कंपनीने जनतेकडून स्विकारलेल्या ठेवी * | ९७९.७० |
| ९) | दि. २७ डिसेंबर २०१८ च्या परिपत्रकाप्रमाणे सभासदांकडून कंपनीने स्विकारलेल्या ठेवी | – |
| १०) | दि. २७ डिसेंबर २०१८ च्या परिपत्रकानुसार जनतेकडून स्विकारलेल्या ठेवी. | ८७४.७० |

* संचालकाकडून आणि इतर कार्पोरेट कडून मिळालेल्या ठेवी सोडून.

**ई. ठेवीच्या शर्ती, कालावधी, व्याजाचा दर, देणींची पद्धत, परतावा व परतफेड**

| | |
|---|---|
| १) | ठेवी ठेवलेल्या तारखेपासुन ३६ महिन्यांपेक्षा जास्त स्विकारले जाणार नाही. |
| २) | व्याजाचा दर एक वर्षासाठी – ९% दोन वर्षासाठी – १०% तिसऱ्या वर्षी – ११% |
| ३) | व्याज दर सहा महिन्यांनी दरवर्षी दि. ३१ मार्च, ३० सप्टेंबर रोजी आणि मुदत संपल्यानंतर देण्यात येईल. |
| ४) | ठेवी अकांउटपेयी चेक किंवा डिमांड ड्राफ्ट किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने स्विकारल्या जातील व त्याच पद्धतीने परतावा दिला जाईल. |

एफ. योजनेची सुरु होण्याची तारीख आणि त्याचा कालावधी परिपत्रकाप्रमाणे किंवा जाहिरातीप्रमाणे अधिकृत राहिल. सदर योजना सुरु होण्याची तारीख नमूद करणारे प्रस्तावित वेळापत्रक आणि सदर परिपत्रक किंवा जाहिरातीच्या वैधतेचा कालावधी : जारी करण्यात आलेली हि जाहीरात दि. २७ डिसेंबर २०१९ पर्यंत किंवा कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत या पैंकी जे अगोदर असेल त्यानुसार वैध असेल.

जी. ठेवी उभारण्याची कारणे किंवा हेतु – कंपनीच्या उद्योगासाठी व्यावसायिक कामासाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीसाठी.

एच. मिळालेले क्रेडिट रेटिंग क्रेडिट एजन्सीचे नाव मिळालेले रेटिंग, मिळालेल्या रेटिंगचा अर्थ, रेटिंग मिळालेली तारीख – एफ ए ए, क्रिसील रेटिंग हे दर्शविते कि वेळेवर व्याजदर देण्यासाठी पुरेशा प्रमाणात सुरक्षित असल्याचे समजण्यात येते, दि. १४ डिसेंबर २०१८

आय. अशा प्रकारच्या ठेवी सुरक्षित करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या किंवा निर्माण करावयाच्या आकाराचा (चार्जस) संक्षिप्त तपशील – लागु नाही, कारण स्विकारलेल्या ठेवी असुरक्षित आहेत.

जे. संचालकाचे / प्रवर्तकाचे किंवा महत्वाच्या व्यवस्थापकांच्या ठेवी किंवा आर्थिक स्वारस्थ इतर लोकांपेक्षा वेगळे : कंपनीत ठेवी ठेवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला वेगळ्या प्रकारचे व्याज देण्याचे कंपनीने सुचविलेले नाही. जर संचालक/प्रवर्तक किंवा महत्वाच्या व्यक्ती कोणतीही ठेवी जमा करत असतील किंवा कोणत्याही व्यक्तीकडून कंपनीत ठेवी ठेवल्या जात असतील तर अस्तित्वात असलेल्या योजनेप्रमाणे व्याज दर लागु राहील.

## ३. कोणतीही थकबाकी असणाऱ्या ठेवींचा तपशील

ए. थकबाकी रक्कम* – ₹ ८,७४,७०,००० दि. २७ डिसेंबर २०१८ फक्त लोकांतर्फे.

बी. ठेव स्विकृतीची तारीख* – दि. १४ जानेवारी २०१६ ते दि. २७ सप्टेंबर २०१८.

सी. स्विकारण्यात आलेली एकूण रक्कम – ₹ ४७,९९,९५,००० दि. २७ डिसेंबर २०१८ (डायरेक्टर आणि इंटर कार्पोरेट डिपॉझीटसहीत) .

डी. व्याजाचा दर :– एक वर्षासाठी – ९%– दोन वर्षासाठी – १०% – तीन वर्षासाठी – ११%

ई. ठेवीदारांची एकूण संख्या* – ३५ दि. २७ डिसेंबर २०१८ रोजी.

एफ. ठेवीची परतफेड व व्याज अदा करण्यामधील दोषपात्रता (डिफॉल्ट), त्यामध्ये डिपॉजिटर्सची संख्या, रक्कम आणि दोषपात्रतेचा कालावधी समाविष्ट (असल्यास) लागु नाही.

जी.ठेवीदाराच्या ठेवीवर गोळा झालेल्या व्याजाचा हक्क सोडणारे : लागु नाही.

* डायरेक्टर व इंटर कार्पोरेट डिपॉझीट ठेवी वगळता.

## ४. कंपनीची आर्थिक स्थिती

ए. कराबाबत तरतुद करण्यापुर्वी किंवा नंतर असलेल्या कंपनीचा नफा, परिपत्रक किंवा जाहिरात जारी केल्याच्या तारखेच्या लगतच्या मागील ३ आर्थिक वर्षांसाठी कराची तरतुद केल्यानंतर असलेला. (₹ लाख मध्ये)

| आर्थिक वर्षे | करपुर्व नफा | करपश्चात नफा |
|---|---|---|
| २०१५–१६ | ५,३३९.३४ | ४,५९९.४६ |
| २०१६–१७ | १,६९६.०५ | १,१०४.४७ |
| २०१७–१८ | ३,८७८.३३ | २,०४८.१४ |

बी. वर निर्देशित ३ आर्थिक वर्षासाठी कंपनीने जाहीर केलेला लाभांश गेल्या ३ वर्षासाठी इंटरेस्ट कव्हरेज रेशो (करपश्चात रोख नफा+अदा केलेले व्याज)

मागील तीन वर्षांचा जाहिर केलेला लाभांश (₹ लाख मध्ये)

| तपशील | २०१७–१८ | २०१६–१७ | २०१५–१६ |
|---|---|---|---|
| जाहिर केलेला लाभांश | – | – | ८% |
| निवडक भागांवर जाहिर केलेला लाभांश | – | – | ३२०.०० |

मागील तीन वर्षांच्या व्याजदराचे प्रमाण

| तपशील | २०१७–१८ | २०१६–१७ | २०१५–१६ |
|---|---|---|---|
| व्याज कव्हरेज गुणोत्तर | ७.८४ पट | ५.९२ पट | १३.१२ पट |

सी . परिपत्रक किंवा जाहिरात जारी करण्याच्या तारखेला लगतच्या मागील वर्षातील ३ लेखापरिक्षित ताळेबंदानुसार कंपनीच्या आर्थिक स्थितीचा संक्षिप्त तपशिल: (₹ लाख मध्ये)

| देणी | ३१/३/२०१८ रोजी | ३१/३/२०१७ रोजी | ३१/३/२०१६ रोजी | मालमत्ता | ३१/३/२०१८ रोजी | ३१/३/२०१७ रोजी | ३१/३/२०१६ रोजी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भागभांडवल | ३,७१८.५६ | १२,०००.०० | १२,०००.०० | कायम मालमत्ता | ३०,२९३.५२ | १९,७६६.६७ | २३,०३८.७६ |
| भागभांडवल बाकी | ८,१०३.०३ | ० | ० | गुंतवणुक | ११,१९,७४४.४६ | ५७.७७ | ५७.७७ |
| राखीव व ज्यादा निधी | ११,८६,०१९.६१ | १२,९३४.०७ | ११,८२९.६० | | | | |
| सुरक्षित कर्जे | ५,५६६.६४ | ३,४६९.३४ | १३७.१९ | चालु मालमत्ता | २३,४३१.३० | १७,४२५.६२ | १५,१२९.५९ |
| असुरक्षित कर्जे | ८,२६२.२३ | ५,४२८.९७ | ७,६३१.८४ | कर्जे उचल व आगाऊ रक्कम | ५४,६२२.९६ | ७,०८५.२२ | ४,९९२.७३ |
| चालु देणी व तरतुद | १४,९४६.०२ | १३,३९९.१४ | ८,२०४.१० | | | | |
| प्रलंबित करदेणी | १,४७५.०१ | ३७५.८५ | १४४.०३ | | | | |
| एकूण | १२,२८,०९१.११ | ४७,६०७.३७ | ३९,९४६.७६ | एकूण | १२,२८,०९१.११ | ४७,६०७.३७ | ३९,९४६.७६ |

(₹ लाख मध्ये)

| संभाव्य देण्यासंबधीचा संक्षिप्त तपशिल | ३१/०३/२०१८ | ३१/०३/२०१७ | ३१/०३/२०१६ |
|---|---|---|---|
| कर व इतर गोष्टी | २७७.९८ | ५६२.७६ | ६,५१०.३९ |
| भांडवली हिशोबावर कंत्राटाची शिल्लक रक्कम व ज्याची तरतुद नाही | ५,४३६.१६ | २,६९३.०४ | ३८२.४२ |
| **एकूण** | **५,७१४.१४** | **३,२५५.८०** | **६,८९२.८२** |

डी. परिपत्रक किंवा जाहिरात जारी करण्याच्या तारखेला लगतच्या वर्षासाठीचे लेखापरिक्षित रोखता प्रवाह (ऑडीटेड कॅश फ्लो) स्टेटमेंट :

(₹ लाख मध्ये)

| तपशील | ३१ मार्च २०१८ | ३१ मार्च २०१७ | ३१ मार्च २०१६ |
|---|---|---|---|
| कामकाजातुन प्राप्त झालेले रोखता प्रवाह | ५,७९०.९२ | ७,७९९.५९ | ४७७.६८ |
| गुंतवणुकीतून प्राप्त झालेले रोखता प्रवाह | – ९,६५५.२० | – ५,८०५.८८ | ४२६.३६ |
| आर्थिक कामकाजातून प्राप्त झालेले रोखता प्रवाह | ३,८६९.०४ | – २०१.८४ | ९३७.८९ |
| रोख रकमेत निव्वळ वाढ (घट) | ४.७६ | १,७९१.८७ | १,८४१.९३ |

ई. गेल्या तीन वर्षांमध्ये लेखा धोरणामध्ये (अकाउटिंग पॉलिसीमध्ये) झालेले बदल आणि त्याचा कंपनीच्या नफा आणि सेवेवर झालेला परिणाम – कंपनीने मागील तीन आर्थिक वर्षांमध्ये लेखा धोरणामध्ये कोणतेही बदल केलेले नाही.

## ५. कंपनीच्या संचालकांद्वारे उद्घोषणा

(ए) संबंधित कायदा लागु झाल्याच्या अगोदर अथवा नंतर किंवा व्याज आदा करण्यासंदर्भात, स्विकारण्यात आलेल्या ठेवींची परतफेड करण्यामध्ये कंपनीची कामगिरी उत्तम असून कंपनीवर कोणताही (डिफॉल्ट संबधी) दोषारोप नाही.

(बी) कंपनीचे व्यवहार आणि प्रस्तावसंदर्भात संचालक मंडळाने स्वत:ची पुर्णपणे खात्री आणि समाधान करुन घेतले आहे आणि संचालक मंडळाचे असे मत आहे की, कंपनीचे भविष्यातील आर्थिक स्थितीसंदर्भातील अंदाज अत्यंत आशादायक आहेत. कंपनीला असणारी देणी ज्या तारखेला देय असतील तेव्हा ती देण्यासाठी कंपनी पुर्णपणे सक्षम आहे आणि परिपत्रक किंवा जाहिरात जारी केल्याच्या तारखेपासुन एक वर्षाच्या कालावधीदरम्यान कंपनी नक्कीच दिवाळखोर बनणार नाही.

(सी) या संदर्भात करण्यात आलेला कायदा आणि अधिनियमाच्या तरतुदींची कंपनीने पुर्तता केली आहे.

(डी) सदर कायदा आणि अधिनियमाच्या तरतुदींची पुर्तता करणे म्हणजे संबंधित ठेवींच्या परतफेडीची हमी केंद्र सरकारने घेतली आहे असे नाही.

(ई) सदर कायदा कार्यान्वित होण्यापूर्वी कंपनीने स्विकारलेल्या ठेवींची रक्कम परतफेड वा त्यावरील व्याजासह परतफेड, मुदतीनंतर जर नुतनीकरण झाले नसेल तर जेव्हा ठेवीदार मागेल त्यावेळेस परत करण्यात येईल आणि जो पर्यंत या ठेवींची परतफेड केली जात नाही तोपर्यंत या ठेवींना असुरक्षित ठेवी समजण्यात येईल आणि त्यांचे रॅकींग पॅरी पॅसू (ज्ञरीळ झरीीी) नुसार इतर असुरक्षित लायबिलिटिज्सोबत असेल.

(एफ) क्रेडीट रेटिंगवर काही प्रतिकुल परिणाम झाल्यास, ठेवीदारांना कोणत्याही प्रकारच्या दंडाशिवाय त्यांच्या ठेवी काढून घेण्याची संधी देण्यात येईल.

(जी) परिपत्रक किंवा जाहिरातीच्या स्वरुपातील परिपत्रकांमध्ये दर्शविण्यात आलेल्या हेतुसाठी केवळ सदर ठेवी वापरण्यात येईल.

(एच) सदर कंपनीद्वारे स्विकारण्यात आलेल्या ठेवी असुरक्षित ठेवी समजण्यात येतील आणि त्याचे रॅंकिंग पॅरी पॅसू (Pari Pasu) नुसार कंपनीच्या इतर असुरक्षित दायित्वासारखीच असेल.

## ६. अस्वीकरण :

हे स्पष्टपणे समजून घेण्याची गरज आहे कि, जाहिरातीच्या स्वरुपात हे परिपत्रक निबंधक यांच्याकडे दाखल केले, ह्याचा अर्थ निबंधक किंवा केंद्र सरकारने ते मंजूर केले असा होत नाही किंवा तसे गृहीत धरूनये. निबंधक किंवा केंद्र सरकार ज्यासाठी ठेव स्विकारण्यात आली आहे किंवा मागविण्यात आली आहे, अशा कोणत्याही ठेव योजनेच्या सक्षमतेची किंवा जाहिरातीच्या स्वरुपातील परिपत्रकात करण्यात आलेले निवेदन किंवा व्यक्त करण्यात आलेले मत यांच्या अचूकतेची कोणतीही जबाबदारी स्विकारत नाही. ठेवीदारांनी ठेव योजनेत गुंतवणूक करण्यापूर्वी याचा सारासार विचार करावा.

सदर परिपत्र हे कंपनीच्या संचालक मंडळाच्या नावे आणि अधिकारा अंतर्गत जारी करण्यात आलेले आहे. त्यामधील मजकुरात दि. २७ डिसेंबर २०१८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कंपनीच्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये मान्यता मिळालेली आहे आणि त्याची प्रत कंपनीच्या संचालकांनी बहुमताने सांक्षाकित केली असुन या परिपत्रकाची प्रत रजिस्ट्रर ऑफ कंपनीज्च्या महाराष्ट्र, पुणे यांच्याकडे दि. १६ जानेवारी २०१९ रोजी दाखल केली आहे.

संचालक मंडळाच्या आदेशाने
**जयहिंद इंडस्ट्रीज लिमिटेड करिता,**

दिनांक – १६ फेब्रुवारी २०१९
स्थळ – आकुर्डी, पुणे.

प्रसन फिरोदिया
व्यवस्थापकीय संचालक

* सर्व कायदेशीर बाबींकरीता इंग्रजीतील जाहिरातच ग्राह्य धरली जाईल.